**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 04.05.2025** **वार- रविवार**

---

**भाषा**

कोट्यवधी मराठी भाषक असूनही मराठी भाषाविज्ञान हा महत्त्वाचा विषय महाराष्ट्रात दुर्लक्षित आहे. राज्याच्या कुठल्याही विद्यापीठात मराठी भाषाविज्ञान शिकण्याची सोय नाही; कारण मराठी भाषेत ते कुठंही शिकवलं जात नाही, अशी खंत ज्येष्ठ भाषातज्ज्ञ प्राध्यापक प्र. ना. परांजपे यांनी पुण्यात व्यक्त केली. मराठीचं भाषाविज्ञान शिकण्याची सोय मराठीमध्येच हवी, असं आग्रही मतही त्यांनी मांडलं. ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉक्टर मिलिंद मालशे यांनी भाषांतर केलेल्या 'सोस्यूर ते चॉम्स्की' या पुस्तकाचं प्रकाशन करताना प्राध्यापक परांजपे बोलत होते. डॉक्टर मालशे म्हणाले की, विसाव्या शतकात सोस्यूर या स्विस अभ्यासकानं व्याख्यानांतून मांडलेली तत्त्वं आधुनिक भाषाविज्ञानाला पायाभूत ठरली. आणि विविध भाषाभ्यासकांनी त्यावर मंथन करून आपापले विचार निबंध आणि पुस्तक रूपांत मांडले. मराठी भाषेत हे विचार एकत्रित यावेत, हा भाषांतर करण्यामागचा एक महत्त्वाचा हेतू होता अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**निकाल**

इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल उद्या ऑनलाईन पद्धतीनं जाहीर करण्यात येणार आहे. उद्या दुपारी एक वाजल्यापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना हा निकाल पाहता येणार आहे.

**दाखले**

राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेअंतर्गत महसूल विभाग आणि भटके विमुक्त विकास परिषद् यांच्याद्वारे आज पुण्यात आयोजित विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दाखले वितरित करण्यात आले. १०० दिवस कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत महसूल विभागानं भटके विमुक्त विकास परिषदेच्यामदतीनं, जिल्ह्यातील भटक्या जाती आणि विमुक्त जातीच्या ३ हजार ९६२ नागरिकांना जातीचे दाखले उपलब्ध करुन दिले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. जिल्ह्यात सुमारे १८ हजार कातकरी समाजाचे नागरिक राहतात.

**नोंदणी**

पुणे जिल्ह्यातील पीएम किसानच्या लाभार्थीपैकी ८७ हजार शेतकऱ्यांनी अद्यापही ॲग्रिस्टॅक नोंदणी केलेली नाही. तत्काळ नोंदणी न केल्यास या शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा आणि कृषी विभागाच्या इतर योजनांचा लाभ मिळण्यास अडचण येईल. असं आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केलं आहे.

**उजनी**

उजनी धरणातील पाण्याची पातळी वेगानं घटत असल्यानं पाणलोट क्षेत्रातील पिकं जगवण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होवू नये म्हणून, पावसाळ्यापर्यंत उजनीचं पाणी आरक्षित करावं अशी मागणी कर्मयोगी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांनी केली आहे.

**मिळकतबिल**

पुणे महापालिकेने यंदा १ मेपासून मिळकतकर बिलांचे वाटप करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, हे बिल मिळण्यापूर्वीच १३ हजार ५९० नागरिकांनी महापालिकेकडे मिळकत करापोटी ४९ कोटी ६ लाख

रुपयांची रक्कम  जमा केली आहे अशी माहिती महापालिकेच्या उपायुक्त आणि मिळकतकर विभागाच्या प्रमुख प्रतिभा पाटील यांनी दिली.

**<u>हास्ययोग</u>**

जागतिक हास्ययोग दिनानिमित्त नवचैतन्य हास्ययोग परिवारातर्फे आज पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित केलेल्या विशेष हास्ययोग कार्यक्रमात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाग घेतला. साहित्यिक आणि व्याख्याते डॉक्टर संजय कळमकर यांचं 'आनंदाच्या वाटा' या विषयावर व्याख्यान यावेळी झाले. जीवन जगताना आनंदात चुका शोधण्याऐवजी चुकांमध्ये आनंद शोधण्याची सवय लावून घ्या असा सल्ला त्यांनी दिला.

**<u>कार्यशाळा</u>**

संशोधन आणि विकास संस्था या DRDO च्या पुण्यातील प्रयोगशाळेतर्फे रोबोटिक्स या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेच आयोजन सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या सहयोगानं ८ ते १० मे दरम्यान करण्यात आलं आहे.  DRDO चे संशोधक या कार्यशाळेत उपस्थित राहणार आहेत.

**<u>सुबद्ध</u>**

भारतीय संगीत प्रसारक मंडळाच्या पुण्यातील गांधर्व महाविद्यालयाच्या 93व्या वर्धापन दिनानिमित्त 1 ते 3 मे दरम्यान सुबद्ध संगीत महोत्सव आयोजित करण्यात आला होता . यामध्ये राजश्री महाजनी , श्रुती देशपांडे , स्वानंदी सडोलीकर, डॉ रवी फडके, धनंजय  जोशी ,  हर्षद डोंगरे , आदी प्रसिद्ध गायकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या रागांचं गायन   केल. शुद्ध सारंग, झिंझोटी, अल्हैया बिलावल, खमाज, मुलतानी, मारवा, अहिरभैरव, शामकल्याण, रागेश्री, हंसध्वनी, शंकरा, पुरिया धनाश्री, गावती अशा विविध रागांच्या सुरेल सादरीकरणा मुळे  सप्तसुरांमध्ये रंगलेला समारोह रसिकांसाठी पर्वणी ठरला.

ज्ञानदेव

पंडित रघुनाथजी खंडाळकर संगीत कला अकादमीच्या वतीनं 'ज्ञानदेव संगीत महोत्सवा' चं आयोजन करण्यात आलं होतं.

युवा व्हायोलिनवादक राजस उपाध्ये यांचं व्हायोलिन वादन, गायक धनंजय हेगडे यांचं बहारदार गायन तर पद्मश्री पुरस्कारप्राप्त तबलावादक पंडित विजय घाटे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'मेलोडिक रिदम' या कार्यक्रमानं रसिक मंत्रमुग्ध झाले. गायन-वादन-नृत्य या तीनही कलांचा अनोखा मिलाफ यातून अनुभवायला मिळाला.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं स्पोटर्सफिल्ड करंडक' अजिंक्यपद १२ वर्षाखालील २५ षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचं ६ ते २१ मे या कालावधीत पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. स्पर्धेचं हे चौथं वर्ष असून यामध्ये १० निमंत्रित संघ सहभागी झाले आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**